# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.01.2025** **वारःगुरुवार**

---

1. केंद्रिय अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आज सर्वपक्षीय बैठक
2. प्रयागराजमधील चेंगराचेंगरीच्या घटनेच्या चौकशीसीठी न्यायालयीन आयोग स्थापन
3. राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज अभियानाला काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी
4. वक्फ सुधारणा विधेयक 2024 वरील मसुदा आज लोकसभा सभापतींसमोर आज मांडला जाणार आणि
5. टाटा स्टील बुध्दीबळ अजिंक्यपद स्पर्धेत डी गुकेश मास्टर्स श्रेणीत अव्वल

**अर्थसंकल्प**

उद्यापासून सुरु होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या वतीनं आज सर्वपक्षीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं उद्या अधिवेशनाची सुरुवात होईल. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारमण येत्या शनिवारी अर्थसंकल्प सादर करणार आहेत. सोमवारी राष्ट्रपतींच्या अभिभाषणातील आभार प्रस्तावावर लोकसभा आणि राज्यसभा सदस्य चर्चा करतील.

**प्रयागराज**

उत्तरप्रदेशातील प्रयागराज इथं महाकुंभमध्ये संगमस्थळावर काल झालेल्या चेंगराचेगरीतील मृतांची संख्या आता 30 झाली आहे आणि 60 जण जखमी झाले आहेत. जखमींना मेला रुग्णालयांत दाखल करण्यात आलं आहे. प्रयागराजमधील सुरक्षा यंत्रणेचा आढावा घेण्यासाठी उत्तरप्रदेशचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक प्रयागराजचा दौरा करणार आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेच्या न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून तीन सदस्यीय आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. ही दुर्घटना का घडली आणि भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, याबद्दलचा अभ्यास हा आयोग करेल. माजी न्यायाधीश हर्ष कुमार यांच्या अध्यक्षतेखाली हा आयोग काम करेल.

मौनी अमावस्येनिमित्त संगमावर स्नानासाठी मोठ्या प्रमाणावर काल भाविकांची गर्दी झाली. रात्री संगमघाटाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुरक्षेसाठी असलेले अडथळे तुटल्यामुळे ही चेंगराचेंगरी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी कालपासून या घटनेचा सतत आढावा घेत असून स्थानिक नागरिकांनी केलेल्या मदतीचा उल्लेख त्यांनी आपल्या संदेशांत केला आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. प्रयागराजसाठी धावणाऱ्या काही रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्याचं वृत्त ही अफवा असून विशेष रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या नसल्याचं मध्य रेल्वेनं स्पष्ट केलं आहे.

**मंत्रिमंडळ निर्णय**

राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज अभियानाला काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली असून, या मोहिमेकरता 34 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत मंत्रीमंडळाच्या निर्णयांची माहिती दिली. महत्त्वाच्या खनिजांची आयात कमी करुन देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी अधिक उत्खनन आणि खाणींचं अधिग्रहण करण्याच्या उद्देशानं हे अभियान सुरु केलं आहे.

ऊसापासून काढलेल्या इथेनॉलच्या खरेदीसाठीचे हमीदरही कालच्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आले. त्यात सी दर्जाच्या मळीपासून काढलेल्या इथेनॉलकरता 57 रुपये 97 पैसे आणि बी दर्जाच्या मळीपासून काढलेल्या इथेनॉलकरता 60 रुपये 73 पैसे प्रति लीटर दर जाहीर झाला आहे. ऊसाचा रस, साखर आणि साखरेच्या सिरपपासून मिळणाऱ्या इथेनॉलकरता 65 रुपये 61 पैसे प्रतिलीटर दर जाहीर झाला आहे. इंधनात इथेनॉल मिसळल्यानं 1 लाख 13 हजार कोटी रुपये मूल्याच्या परदेशी चलनाची बचत होत असून, गेल्या वर्षात इथेनॉल खरेदीद्वारे शेतकऱ्यांना 40 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम देण्यात आल्याची माहिती अश्विनी वैष्णव यांनी यावेळी दिली.

**वक्फ**

संसदेच्या संयुक्त समितीने वक्फ सुधारणा विधेयक 2024 वरील मसुदा अहवाल स्वीकारला. या विधेयकाशी संबंधित 14 कलमांवरील सुधारणा समितीने स्वीकारल्या आहेत, त्याविषयीचा अहवाल आज लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना सादर करणार आहे, असं 31 सदस्यीय समितीच्या अध्यक्षा जगदंबिका पाल यांनी काल सांगितलं. नोंदणींचे डिजीटायझेशन, लेखापरीक्षण, बेकायदेशीरपणे कब्जा केलेल्या वक्फ मालमत्ता परत मिळवण्यासाठी कायदेशीर यंत्रणेत महत्त्वपूर्ण सुधारणा अशा बाबींचा विधेयकांत समावेश आहे. दरम्यान विरोधी पक्ष सदस्यांनी हा अहवाल स्वीकारण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. हा अहवाल घाईनं स्वीकारण्यात आल्याचं द्रमुक खासदार ए. राजा यांनी म्हटलं आहे. तर आपले अनेक आक्षेप आणि सूचना अहवालात समाविष्ट करण्यात आल्या नसल्याची टिका काँग्रेसचे नसीर हुसेन यांनी केली आहे. इतरही विरोधी खासदारांनी यावर असहमतीची नोंद केली आहे.

**ट्रंप**

क्युबामधील ग्वांतानामो बे इथल्या अमेरिकन नौदल तळावर 30 हजार खाटांची स्थलांतरित कैदीगृह बांधण्याची योजना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी जाहीर केली आहे. हे नवीन केंद्र सध्याच्या अति सुरक्षित तुरुंगापेक्षा वेगळे असेल आणि त्यात बेकायदेशीर परदेशी स्थलांतरित गुन्हेगार कैदी ठेवले जातील. स्थलांतर आणि जकात संचालनालय अर्थात ICE द्वारे चालवल्या जाणाऱ्या या सुविधेमुळे सध्याच्या जागेचा विस्तार होईल, तसंच समुद्रमार्गे होणारं स्थलांतर रोखण्यात यश येईल. अशी आशा ट्रंप यांनी व्यक्त केली.

दरम्यान, क्यूबन सरकारनं या निर्णयाचा निषेध केला आहे आणि हा निर्णय बेकायदेशीर आणि अमानवीय असल्याची टिका केली आहे. हिंसक गुन्ह्यांचा आरोप असलेल्या मात्र अधिकृत कागदपत्र नसलेल्या स्थलांतरितांना तुरुंगात टाकण्याची तरतूद असलेल्या लेकन रिले कायद्यावर स्वाक्षरी केल्यानंतर ट्रंप यांनी ही घोषणा केली, व्हेनेझुएलाच्या एका स्थलांतरितानं जॉर्जियातील एका नर्सिंग विद्यार्थिनीची हत्या केल्याच्या नावावरून या कायद्याचे नाव देण्यात आले आहे.

**भारत-अमेरिका**

भारत-अमेरिका दरम्यान वैधानिक गटासाठी अमेरिकेतील डेमोक्रॅटिक पक्षाचे मंत्री रो खन्ना आणि त्यांचे रिपब्लिकन सहकारी रिच मॅककॉर्मिक हे या कॉकसचे सह-अध्यक्ष असतील अशी घोषणा रो खन्ना यांनी केली. ते आता राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार माइक वॉल्झ यांची जागा घेतील.

**प्रल्हाद-जोशी**

केंद्र सरकार 2030 पर्यंत गैर-जीवाश्म इंधनांद्वारे 500 गिगावॅट वीज आणि ऊर्जा निर्मिती करण्याच्या दिशेनं काम करत असल्याचं नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी काल नवी दिल्ली इथं सांगितलं. तिसऱ्या भारत उर्जा संक्रमण परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. येत्या काही वर्षांत ऊर्जेची मागणी दुप्पट होण्याची शक्यता आहे आणि भविष्यातील गरजेच्या एकंदर पन्नास टक्के अक्षय ऊर्जेद्वारे पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान सूर्य घर योजनेअंतर्गत नियोजित एक कोटी सौर

पॅनेलपैकी साडेआठ लाख सौर पॅनेल यापूर्वीच बसवण्यात आले आहेत. 2014 मध्ये एकंदर 75 गिगावॅटपेक्षा अधिक असलेली अक्षय उर्जा क्षमता गेल्या दहा वर्षांत, एकंदर 200 टक्क्यांनी वाढून आज 220 गिगावॅट झाली आहे. अशी माहिती जोशी यांनी यावेळी बोलताना दिली. FICCI चा 'पॉवरिंग इंडियाज एनर्जी ट्रान्झिशन' अहवालही कालच्या परिषदेत त्यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

**परतीचीधून**

76 व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाची सांगता काल संध्याकाळी परतीची धून अर्थात बीटिंग रिट्रीट समारंभाने झाली. यावेळी लष्कराची तीनही दले तसेच केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या बँडनं 30 सुरावटी सादर केल्या. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि अन्य केंद्रीय मंत्री उपस्थित होते. परतीच्या धूनची सुरुवात 'कदम कदम बढाये जा' या सुरावटीने झाली त्यानंतर विविध बँडसकडून झालेल्या सादरीकरणानं उपस्थितांची मन जिंकली. कार्यक्रमाची सांगता 'सारे जहाँ से अच्छा' या गाण्यानं झाली.

**चित्ररथ**

26 जानेवारी रोजी नवी दिल्लीतील कार्तव्य पथ इथं झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात उत्तर प्रदेशच्या "महाकुंभ 2025" या चित्ररथाला सर्वोत्कृष्ट, जम्मू-काश्मीर रायफल्सला सर्वोत्कृष्ट पथकाचा पुरस्कार मिळाला. तर, त्रिपुराच्या 'शाश्वत श्रद्धा: त्रिपुरातील 14 देवतांची पूजा-खारची पूजा' या संकल्पनेवर आधारित रथाला दुसरं आणि आंध्र प्रदेशच्या 'एतिकोप्पका बोम्मलू - पर्यावरणपूरक लाकडी खेळणी' या चित्ररथाला तिसरं स्थान मिळालं. सेवांमध्ये सर्वोत्तम पथकाचा पुरस्कार जम्मू आणि काश्मीर रायफल्सनं जिंकला, तर सीएपीएफ आणि इतर सहाय्यक दलांमध्ये दिल्ली पोलिस पथकानं पुरस्कार जिंकला.

**महात्मा गांधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 77व्या पुण्यतिथीनिमित्त देशभर आज विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. सकाळी नवी दिल्लीतील राजघाट इथं महात्मा गांधी यांच्या समाधीस्थळी सर्व-धर्म प्रार्थना आयोजित केली जाईल.

**बुध्दीबळ**

नेदरलँड्समध्ये सुरु असलेल्या टाटा स्टील बुध्दीबळ अजिंक्यपद स्पर्धेत 10 व्या फेरीच्या सामन्यात भारताच्या डी गुकेश यानं डच प्रतिस्पर्धी मॅक्स वारमरडॅमवर विजय मिळवला. यामुळे मास्टर्स श्रेणीमध्ये गुकेशनं आपलं स्थान कायम ठेवलं आहे. यापूर्वी, नवव्या फेरीत, त्याने स्पॅनिश ओपनिंगमध्ये लिओन ल्यूक मेंडोन्काला हरवून आपली आघाडी राखली.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार